चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
१५ जुन, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7447744100 (PRO)

# दुचाकी चोरणारा आरोपी भद्रावती पोलीसांच्या जाळयात

## २ लक्ष ५ हजाराच्या ०४ दुचाकी जप्त

दिनांक १४/०६/२०२० रोजी पोलीस स्टेशन भद्रावती येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम भद्रावती शहरात संशयीतरित्या चोरी करण्याच्या उद्देशाने फिरत आहे. आणि त्याचे कडे एक पोलीस स्टेशन भद्रावती येथे दाखल चोरीच्या गुन्हयातील दुचाकी असल्याचा संशय आहे. अशी माहिती मिळताच भद्रावती पोलीसांनी तात्काळ मिळालेल्या माहिती ठिकाणी पोहचुन डोलारा तलाव चंडिका वार्ड भद्रावती येथुन एका इसम नामे राजकुमार उर्फ राजा बालाजी धुर्वे वय २५ रा. नांदेड ता.चिमुर यास ताब्यात घेतले. सदर इसमास विचारपुस केली असता त्यांनी कबुली दिली की, त्यांनी भद्रावती किल्ला वार्ड येथुन दुचाकी क्र. एमएच ३४ एवाय २८३५ चोरी केली होती. सदर आरोपीस अटक करून त्याची कसुन चौकशी केली असता त्यांने याव्यतीरिक्त कोसंबी, उंबरवाही, काळजसर या ठिकाणाहुन सुध्दा दुचाकी चोरल्याची कबुली दिल्याने आरोपीकडुन **एकुण ४ दुचाकी** किं. २,०५,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेड्डी आणि अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात, पोलीस स्टेशन भद्रावती ठाणेदार पोनि. सुनिलसिंग पवार, पोउपनि. अमोल तुळजेवार, पोहवा. राजेश वराडे, पोशि. सचिन गुरनुले, निकेश ढेंगे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————

# कोरपना पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## ६ आरोपीकडुन १ लक्ष ११ हजाराचा मुददेमाल जप्त

दिनांक १४/०६/२०२० रोजी पोलीस स्टेशन कोरपना येथील पोलीसांनी पोस्टे परिसरात दारू तस्करांविरूध्द कार्यवाही करीत ५ गुन्हे नोंद करून १,११,०००/—रू चा मुदद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस स्टेशन कोरपना येथील पोलीस पथकाने दिनांक १४/०६/२०२० रोजी पोस्टे परिसरातील हेटी फाटा आणि पारडी येथे नाकेबंदी सुरू केली. नाकेबदी दरम्यान हेटी फाटा येथे एक आणि पारडी येथे ०४ कार्यवाही करीत ११० बॉटल देशी दारू चा माल जप्त केला आहे. सदर दारूचा माल आणि वाहन असा एकुण १,११,०००/—रू चा मुदद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी नामे १)गजानन पुरूषोत्तम आत्राम, रा पारडी, २)कवडु केशव राउत, पारडी, ३)रामचंद्र शानदेव मडावी, रा. कुसर, कोरपना, ४)साहील हमीद शेख, ५)अरबाज रजाक शेख, ६)अफरोज रफिक शेख तिन्ही रा. कोरपना यांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास कोरपना पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेड्डी आणि अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात, पोलीस स्टेशन कोरपना ठाणेदार पोनि. ए.एम.गुरनुले यांचे सह पोलीस स्टेशन कोरपना येथील पोलीस कर्मचारी यांनी पार पाडली.

———————————————————————————————